**पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष,**
**गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय**

---

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - २३/०३/२०२६**

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांची बृहन्मुंबईमध्ये PIT-NDPS अंतर्गत कारवाई दरम्यान ड्रग्ज् तस्करी करणारा इसम नामे १) अहमद मोहम्मद शफी शेख उर्फ अकबर खाऊ, वय ४२ वर्षे, २) मोहम्मद फरीद रेहमतुल्ला शेख उर्फ चुहा, वय ३१ वर्षे व ३) सरफराज साबिर अली खान उर्फ भुरा, वय ४० वर्षे, यांस १ वर्षे करीता स्थानबध्द केलेबाबत.**

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे घाटकोपर युनिट, अं.प.वि.कक्ष, मुंबई यांनी त्यांचेकडील गु.र.क्र. ८७/२०२५, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अन्वये दाखल गुन्हयात अंमली पदार्थाची तस्करी करणारे **अटक आरोपी सराईत गुन्हेगार नामे १) अहमद मोहम्मद शफी शेख उर्फ अकबर खाऊ, वय ४२ वर्षे, रा.ठि.- कुर्ला (प.), मुंबई, २) मोहम्मद फरीद रेहमतुल्ला शेख उर्फ चुहा, वय ३१ वर्षे, रा.ठि - कुर्ला (प), मुंबई व ३) सरफराज साबीर अली खान उर्फ भुरा, वय ४० वर्षे, रा.ठि.- विक्रोळी (पू) मुंबई** यांचेवर मेफेड्रॉन (एम.डी) या अंमली पदार्थाची तस्करीचे एन.डी.पी.एस. कायदयान्वये गुन्हे दाखल असल्याचे दिसुन आले. तसेच नमुद गुन्हयात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन ते न्यायप्रविष्ठ होते. तसेच नमुद आरोपी हे काही गुन्हयात जामीनावर मुक्त असुन ते जामीनावर सुटताच परत अंमली पदार्थाचा व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांचेविरुदध मा. पोलीस आयुक्त सो. बृहन्मुंबई यांचेवतीने अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये अंमली पदार्थ विरोधी कक्ष, घाटकोपर युनिट, गु.शा. मुंबई यांनी स्थानबध्द आदेश जारी होण्याकरीता मा. स्थानबध्द अधिकारी तथा प्रधान सचिव सो (विशेष) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांस प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदरच्या स्थानबध्द प्रस्तावास गृह विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडुन मंजुरी आदेश प्राप्त झाले. त्यानुसार नमुद इसमांस ताब्यात घेवुन त्यांना स्थानबध्द आदेशाची बजावणी करून ०१ वर्ष स्थानबध्दतेकरीता आरोपी नामे **१) अहमद मोहम्मद शफी शेख उर्फ अकबर खाऊ, वय ४२ वर्षे,** यास दि. ०६/०३/२०२६ रोजी नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर, **२) मोहम्मद फरीद रेहमतुल्ला शेख उर्फ चुहा, वय ३१ वर्षे,** यास दि. १४/०३/२०२६ रोजी छत्रपती संभाजी नगर मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजी नगर **व ३) सरफराज साबिर अली खान उर्फ भुरा, वय ४० वर्षे,** यास दि. २२/०३/२०२६ रोजी अमरावती मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे.

- **अहमद मोहम्मद शफी शेख उर्फ अकबर खाऊ, वय ४२ वर्षे** हा अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख:-

१) वरळी युनिट, अ.प.वि.क, मुंबई गु.क्र. ८३/२०१२, कलम ८(क) सह २०, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) वि.बी.नगर पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. १३२/२०१६, कलम ८(क) सह २२, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
३) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. १९/२०२१, कलम ८(क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
४) वरळी युनिट, अ.प.वि.क, मुंबई, गु.र.क्र. ३२/२०२१, कलम ८(क) सह २० एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
५) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. ५९/२०२३, कलम ८(क) सह २१ (क) २०(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
६) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. ३५६/२०२३, कलम ८ (क) सह २१ (ब), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५
७) ठाणेनगर पोलीस ठाणे वि.स्था.गु.र.क्र.२९४ /२०२३, कलम ८ (क) सह २२(क) २० (ब) एन.डी.पी.एस.कायदा १९८५

➢ **मोहम्मद फरीद रेहमतुल्ला शेख उर्फ चुहा, वय ३१ वर्षे** हा अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख:-

१) वि.बी.नगर पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. ८५/२०१८, कलम ८(क) सह २२ (ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. ५९/२०२३, कलम ८(क) सह २१ (क) २०(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
३) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. ३५६/२०२३, कलम ८ (क) सह २१ (ब), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५
४) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.क्र. २४०/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५
५) अं.प.वि.कक्ष घाटकोपर गु.र.क्र. १५/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५
६) अं.प.वि.कक्ष घाटकोपर गु.र.क्र. ८७/२०२५, कलम ८ (क) सह २२ (क) एन.डी.पी.एस.कायदा १९८५

➢ **सरफराज साबीर अली खान उर्फ भुरा, वय ४० वर्षे** हा अंमली पदार्थ व्यवसायात सक्रीय असल्याचे अंमली पदार्थ विरोधी कायदयाअंतर्गत दाखल गुन्हे अभिलेख:-

१) बांद्रा युनिट, अ.प.वि.क, मुंबई गु.र.क्र. १०/२०१८, कलम ८(क) सह २२(क) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
२) वरळी युनिट, अ.प.वि.क, मुंबईगु.र.क्र. ०२/२०१९, कलम ८(क) सह २२, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
३) कुर्ला पो.ठाणे, वि.स्था.गु.र.क्र. ०९/२०२१, कलम ८(क) सह २०, २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
४) कुर्ला पो. ठाणे,वि.स्था.गु.र.क्र. ६७/२०२२, कलम ८(क) सह २२(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
५) आझाद मैदान युनिट, अ.प.वि.क,मुंबई गु.र.क्र. १४४/२०२२, कलम ८(क) सह २२(ब),२९एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५
६) युनिट ६, डी.सी.बी. सी.आय.डी. गु.र.क्र. ५६/२०२३, कलम ४२०, ४६५,४६८,४७१ भा.द.वि. सह ८(क) सह २२(क),२०,२९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५
७)घाटकोपर युनिट, अं.प.वि.क, मुंबई गु.र.क्र.६८/२०२५, कलम ८ (क) सह २२(क)२९एन.डी.पी.एस.कायदा १९८५

**सन २०२६ मध्ये अद्यापपर्यत मुंबई पोलीस आयुक्तालयातील अंमली औषधीद्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ विधिनिषीद्ध व्यापार प्रतिबंध अधिनियम १९८८ (PIT NDPS ACT 1988) अन्वये खरेदी व विक्री करणाऱ्या ०६ आरोपीतांना ०१ वर्षाकरीता स्थानबध्द करण्यात आलेले आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री शैलेश बलकवडे, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. नवनाथ ढवळे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व मा.श्री.सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, घाटकोपर युनिटचे वरिष्ठ पो.नि. अनिल ढोले, पो.नि. दिगंबर पाटील तसेच गुन्हे प्रतिबंधक शाखेचे व.पो.नि. सुवर्णा अडसुळे, पो. नि. सरीता गावडे, स.पो.नि. रविंद्र पाटील, पो.उ.नि. संदिप शिंदे, पो.उ.नि. सतिश निंबाळकर यांनी केली आहे.

------oooo------